# नियमित दिवाणी दावा क्र.९१/२०१५ मधील निशाणी ९६ वरील आदेश
## (धोंडीराम पाटील विरुध्द नंदकुमार थोरात)
## (**CNR No.MHSN**050003792015)

वादींनी प्रस्तुत अर्ज कागदपत्र दाखल करण्यास परवानगी मिळणेबाबत सादर केलेला आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. वादींचे विद्वान विधीज्ञांनी असे प्रतिपादन केले की, अर्जासोबत जोडलेली कागदपत्रं उभयपक्षातील वाद निराकरणाकरिता आवश्यक आहेत. सबब त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली. याउलट, प्रतिवादीचे विद्वान विधीज्ञांनी वादीचा अर्ज अमान्य असल्याचे प्रतिपादन करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. वादींनी मुळ दावा गहाण फेडीकरीता व गहाणाचा दस्त उलटून मिळणेकरीता दाखल केला आहे, याबाबत दुमत नाही. कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादीतर्फे दाखल केलेली कागदपत्रं मा.सर्वोच्च न्यायालयात स्पेशल लिव्ह पिटीशन नं. ३५९४६/२०२५ दाखल केल्याबाबत असल्याचे दिसते. उभय पक्षांमध्ये गहाणखतासंदर्भात वाद असल्याचे दिसून येते. उभय पक्षातील वाद व प्रस्तुत अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचे स्वरुप लक्षात घेता उभय पक्षातील वाद निराकरणाकरिता अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल, असे माझे स्पष्ट मत आहे. परिणामी मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

कागदपत्र दाखल करून घेण्यापुरता अर्ज मंजूर करण्यात आला.

KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Digitally signed by KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Date: 2025.07.24 12:49:52 +0530

**इस्लामपूर** **(भगवान म. कारलेकर)**

**दिनांकः– २२/०७/२०२५** **सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, इस्लामपूर.**

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | – | सह दिवाणी न्यायालय व. स्तर, इस्लामपूर. |
| आदेश घोषीत दिनांक | – | **२२/०७/२०२५** |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक | – | **२४/०७/२०२५** |